DISTRICT AND SESSIONS COURT
Akashwani Square, Civil Lines, Nagpur.
**Computer Section**

| Email Id : | **Telephone No. :** |
|---|---|
| **mahnagdc@mhstate.nic.in** | 0712-2531989(Registrar Section)<br>0712-2995640(Computer Section) |
| Endt. No./Computer /५६६/2026 | Date :०६/02/2026 |

संदर्भ : १)जिल्हा न्यायालय संगणक समिती, यांचे दिनांक ०९/०१/२०२६ रोजीच्या सभेचे ईतिवृत्त.
२)जिल्हा न्यायालय संगणक समिती, यांचे दिनांक ०४/०२/२०२६ रोजीच्या सभेचे ईतिवृत्त.

## प्रिंटर कार्टेजेस उपलब्ध करुन देण्यासाठी दरपत्रके निविदा **(Tender)**/वार्षिक मुल्य करार **(Annual Rate Contract)** पत्रके मागविण्याकरीता सुचना (एकदा पुन्हा)

जिल्हा न्यायालय, नागपूर अंतर्गत येणारे सर्व न्यायालय व कार्यालयीन विभागातील Brother HL-B2180DWB प्रिंटर करीता TNB021 मॉडेलचे प्रिंटर कार्टेजेस उपलब्ध करुन देण्याकरिता, खालील दिलेल्या अटींवर दिनांक १०/०२/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत "प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर" यांचे नावाने सिलबंद निविदा (दरपत्रके) मागविण्यात येत आहे.

### अटी व शर्ती

सर्वसाधारण सुचना

१. जिल्हा न्यायालय, नागपूर अंतर्गत येणारे सर्व न्यायालय व कार्यालयीन विभागातील खालीलप्रमाणे असलेले प्रिंटरचे, नमुद केलेले मॉडेलचे कार्टेजेस उपलब्ध करुन देण्याकरिता, दरपत्रके/वार्षिक मुल्य करार पत्रके, खालील दिलेल्या नमुन्यात, विहीत मुदतीस सादर करणे गरजेचे आहे.

| अ. क्र. | प्रिंटर | कार्टेजेसचे मॉडेल | कार्टेजेसच्या कंपनीचे नांव | दर (प्रति कार्टेजेस रु.) (कर/सर्व शुल्क अंर्तभुत करुन) | एकुण कार्टेजेस (एका वर्षाकरीता) | एकुण शुल्क रुपये (कर/सर्व शुल्क अंर्तभुत करुन) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Brother HL-B2180DWB | TNB021 | Brother | | 400 | |

२. आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांनी कोणतेही कारणांशिवाय संबंधीत निविदा/वार्षिक मुल्य करार पुर्णपणे रद्य करण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे. पुरवठा आदेश किंवा वार्षिक मुल्य करार निर्गमित करणेबाबत, आदरणीय प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब यांचा निर्णय अंतिम राहील.

३. संबंधित दर हे पुढील १ वर्षापर्यंत वैध राहतील. कोणत्याही परिस्थीतीत दर वाढ होणार नाही. बाजारात संबंधीत वस्तुंचे दर कमी झाल्यास, आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संबंधित विक्रेता/पुरवठादारास, त्या कमी मुल्यावर प्रिंटर कार्टेजेसचे पुरवठा करण्याकरिता आदेशीत करतील व तो आदेश संबंधित विक्रेता यांना बंधनकारक असेल.

४. यशस्वी पुरवठादारास, प्रिंटर कार्टेजेस पुरविण्याचा आदेश प्राप्त होताच पुढील ३ कार्यालयीन दिवसांच्या आत प्रिंटर कार्टेजेसचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

५. निविदा/वार्षिक मुल्य करार पत्रके, सादर करणारे विक्रेता/पुरवठादार Government e-Marketplace (Gem) पोर्टलवर नोंदणीकृत असणे गरजेचे आहे. विक्रेता/पुरवठादार Gem-Portal वर Suspended नसावे.

६. उपरोक्तप्रमाणे प्रिंटर कार्टेजेसचे दरपत्रके/वार्षिक करार पत्रके सादर करतांना प्रिंटर कार्टेजेसचा पुरवठा करण्याकरिता आवश्यक असलेले सर्व प्रकारचे शुल्क (प्रिंटर कार्टेजेसचे मुल्य, सर्व प्रकारचे कर, परिवहन शुल्क ईत्यादी सर्व) समावुन सादर करावे. उपरोक्त एकुण शुल्क व्यतिरीक्त अन्य कोणतेही शुल्क देय राहणार नाही.

७. पुरवठादार/विक्रेता यांचे न्यायालयीन कर्मचा-यांसोबत कोणतेही हितसंबंध नसावे.

८. दरपत्रकासोबत पॅन कार्ड, जीएसटीनंबर, Gem-Seller ID तसेच अनुभवसंबंधी आवश्यक असलेले सर्व प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

मागील प्रकल्प अनुभव**(Past Project Experience)**

९. संबंधित प्रिंटर कार्टेजेस कोणत्याही शासकिय/सार्वजनिक/खाजगी क्षेत्र/खाजगी उपक्रमात पुरवठा करण्याच्या किमान १ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

पुरवठयाची व्याप्ती **(Scope of Supply)**

१०. जिल्हा न्यायालय, नागपूर यांचे द्वारे आवश्यकतेनुसार अथवा ठरवुन दिलेले वेळापत्रकानुसार टप्याटप्यात प्रिंटर कार्टेजेस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

हमी **(Warranty)**

११. प्रिंटर कार्टेजेस मधुन कमीतकमी २५०० प्रिंट निघणे गरजेचे राहील.

१२. पुरवठादार यांनी वेळापत्रकानुसार वेळोवेळी पुरवठा केलेली कार्टेजेसची गुणवत्ता व कार्यक्षमता एकसारखी असावी याबद्यल हमीपत्र सादर करावे.

१३. प्रिंटर कार्टेजेस मुळे प्रिंटरचे कोणतेही हार्डवेअरचे नुकसान होणार नाही, याची सर्वस्व जबाबदारी विक्रेता/पुरवठादाराची असेल. विक्रेता/पुरवठादारास सदोष प्रिंटर कार्टेजेस (Defective Cartridges) पुढील ३ कार्यालयीन दिवसांच्या आत बदलुन द्यावे लागेल.

१४. आवश्यकतेनुसार विक्रेता/पुरवठादारास त्वरित सेवा व सहाय्यता पुरविणे आवश्यक असेल. समाधानकारक सेवा न पुरविल्यास, १५ दिवसांची आगाउ सुचना देउन आपले करार रद्य करण्याचा अधिकार, आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी राखुन ठवलेला आहे.

१५. सेवा समर्थनासाठी समर्पित टोल फ्री क्रमांक/दुरध्वनी/मोबाईल क्रमांक पुरविणे आवश्यक असेल.

१६. समर्पित टोल फ्री क्रमांक/दुरध्वनी/मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी चे वाढीव (Escalation Matrix) मॅट्रीक्स पुरविणे बंधनकारक आहे.

१७. आदरणीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे नावाने ३ प्रतित आपल्या कार्यालयाचे देयक (Invoice) सादर केल्यावर १ महिण्याचे आत देयकांचे भुगतान NEFT/RTGS द्वारे करण्यात येईल.

१८. विहित नमुन्यामध्ये नसलेले निविदा/वार्षिक मुल्य करार पत्रके नामंजुर करण्यात येतील.

दिनांक : ०५/०२/२०२६

आदेशान्वये,

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, नागपूर.